**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, बी विंग, पहिला माळा
"वनभवन", सिव्हील लाईन्स, रामगिरी रोड, नागपूर ४४०००१
दुरध्वनी क्र.०७१२-२५५६९१६, ई-मेल-apccfnodal@mahaforest.gov.in

**ई-मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे**

क्र.कक्ष-१७/नोडल/गडचिरोली/आयडी-१२९८७/३७४ /२०२३-२४
नागपूर ४४० ००१, दिनांक ०९ /०५/२०२३

प्रति,
वनसंरक्षक (प्रा.),
गडचिरोली

विषय :- Diversion of 54.274 ha. of Reserved Forest and Protected Forest in favour of Ministry of Road Transport and Highway, National Highway Division, Gadchiroli for Up-gradation to 2/4 lane with paved shoulder configuration of Gadchiroli-Allapalli-Sironcha of NH-353 C from Gitali-Mosam-Zamela Nalla in Gadchiroli District in the State of Maharashtra-regarding.

संदर्भ :-
1. Government of India, MoEF&CC, Integrated Regional Office, Nagpur letter dated 30/01/2023 of F.No.FC-III/MH-54/2022-NGP/11062.
2. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष/१७/नोडल/गडचिरोली/आयडी-१२९८७/२९३७/२०२२-२३, दि.०२/०२/२०२३.
3. वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडील पत्र क्र.कक्ष-७/सर्व्हे/जमीन/६६, दि.२१/०४/२०२३.

विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाकडील संदर्भ क्र.१ येथे नमुद पत्रान्वये ७ मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते. त्यानुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र.२ येथे नमुद पत्रान्वये त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून पुर्तता करून घेऊन, पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मुद्देनिहाय पुर्तता अहवाल आवश्यक दस्तऐवजांसह आंग्ल भाषेत तीन प्रतीत सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने आपलेकडून संदर्भ क्र.३ येथे नमुद पत्रान्वये त्याबाबतचा अहवाल तीन प्रतीत सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालाची छाननी केली असता खालील त्रृट्या आढळून येत आहेत.

१) मुद्दा क्र.(i) च्या पुर्ततेसाठी आवश्यक असलेल्या पर्यायी वनीकरणाबाबतचा विसंगती नसलेला वनजमीनीचा तपशील, उपवनसंरक्षक यांचे CA area suitability Certificate त्यानुसार तीन प्रतीत सुधारीत KML file CD व सदर मुद्याच्या पुर्ततेच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक यांचे आंग्ल भाषेत स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्यात आलेल्या नाहीत.

२) मुद्दा क्र.(ii) बाबत पुर्ततेच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक यांचे आंग्ल भाषेत स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्यात आलेले नाहीत.

३) मुद्दा क्र.(vii) मध्ये केंद्र शासनाकडून FDCM ची NOC सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याबाबतीत प्रकल्प यंत्रणेकडून नाहरकत प्रमाणपत्राऐवजी हमीपत्र सादर करण्यात आले असल्याबाबत आपलेकडील पत्रात नमुद करण्यात आले आहे, ज्याव्दारे सदर मुद्याची पुर्तता झाली किंवा कसे ? याबाबतीत वृत्तस्तरीय कार्यालयाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय आंग्ल भाषेत सादर करण्यात आलेले नाहीत.

तरी, प्रकरणी करावयाच्या पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी उपरोक्त नमुद मुद्यांच्या पुर्ततेसह केंद्र शासनाकडील संदर्भ क्र.१ येथे नमूद पत्रातील वन्यजीव विभागशी संबंधित असलेला मुद्दा क्र.(iii) वगळून इतर ६ मुद्यांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय पुर्तता अहवाल आवश्यक दस्तऐवजांसह आंग्ल भाषेत तीन प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावा, हि विनंती.

सहपत्र:- प्राप्त अहवालाच्या दोन प्रती.

(डॉ.कुमारस्वामी एस.आर.)
उपवनसंरक्षक, वन (संवर्धन)
नागपूर

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस समादराने सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी:- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. (E-mail address: nhgadchiroli.ee@mahapwd.com)